Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ६७]  मंगळवार, डिसेंबर १६, २०२५/ अग्रहायण २५, शके १९४७  [पृष्ठे ५, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९७.

**आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल.**

### सूचना

क्रमांक मनपाना-नरवि-२०१७-२०२५.—

नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस २४९६ २६४३-प्र.क्र. ३००(अ)-१७-नवि-९, दिनांक ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०१ मार्च, २००० पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरित नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते.

तथापि, शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४-२०१९-नवि-९, दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर सुधार प्रन्यासच्या

कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते.

परंतु, शासन निर्णय क्र. टिपीएस २४१९-१४१९-प्र.क्र. १५४ (भाग-१)-२०१९-नवि-९, दिनांक ०९ एप्रिल, २०२१ अन्वये नागपूर महानगरपालिकेकडील असलेल्या ७ योजनेतील मौजा पारडी, पूनापूर, भरतवाडा, भांडेवाडी मधील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजना क्र. १ अंतर्गतच्या जमिनी वगळून नियोजन प्राधिकरणाचे अधिकार पुनश्चः नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना प्रदान करण्यात आले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मौजा - परसोडी येथील नेल्को गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर मधील खसरा क्र. ६३ ते ६९ व ७१ "पार्किंग" (एस.डब्लु-८२) एकूण क्षेत्र ०.४०३५ हेक्टर जागा मंजूर अभिन्यासासह दर्शविलेले अंदाजे ०.०६७२ हेक्टर क्षेत्र कायम ठेऊन उर्वरित जागा "निवासी" उपयोगाकरीता करण्यासाठी तसेच विकास योजनेतील "प्राथमिक शाळा" (एम.एस.डब्लु-१३) व लायब्ररी (एम.एस.डब्लु-१२) असे एकूण क्षेत्र १.२४६५ हेक्टर जागा आरक्षणातून वगळून "खेळाचे मैदान" (PG) उपयोगाकरीता करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. उक्त जागा नागपूर सुधार प्रन्यासचे "भामटी-परसोडी स्ट्रीट स्कीम" अंतर्गत समाविष्ट आहे.

सबब,सदर प्रस्तावातील फेरबदलासंबधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा - परसोडी येथील नेल्को गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर मधील खसरा क्र. ६३ ते ६९ व ७१ "पार्किंग" (एस.डब्लु-८२) एकूण क्षेत्र ०.४०३५ हेक्टर जागा मंजूर अभिन्यासासह दर्शविलेले अंदाजे ०.०६७२ हेक्टर क्षेत्र पार्किंगच्या आरक्षणात कायम ठेऊन उर्वरित जागा "निवासी" उपयोगाकरीता करण्यासाठी तसेच विकास योजनेतील "प्राथमिक शाळा" (एम.एस.डब्लु-१३) व लायब्ररी (एम.एस.डब्लु-१२) असे एकूण क्षेत्र १.२४६५ हेक्टर जागा आरक्षणातून वगळून "खेळाचे मैदान" (PG) उपयोगाकरीता करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ८५-मनपा-प्रशासक, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या उपसंचालक, नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडून शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

**डॉ. अभिजित चौधरी,**
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक १५ डिसेंबर, २०२५.

———————

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९८.

BY COMMISSIONER AND ADMINISTRATOR, MUNICIPAL CORPORATION

**Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. NMC-TPD-2017-2025.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City Sanctioned under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, section 31(*1*) has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS- 2496-2643-CR-300(a)-97-UD-9, Dt. 7th January, 2000 and came into force from 1st March, 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, Dt. 10th September, 2001 and came into force from Dt. 21st September, 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the 'Planning Authority' for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notifica-

tion No. TPS-2401-855-CR-76-UD-9, Dt. 27th February, 2002 and Nagpur Municipal Corporation has been declared as "Planning Authority" for Nagpur City the areas covered under seven scheme *vide* Govt Notification No. TPS-2419-1419-CR-154-2019-UD-9, Dt. 27th August, 2019 and also Nagpur Municipal Corporation has been declared as "Planning Authority" for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2419 1419-C.R.154b (Part -1)/2019 UD-9, Dt. 9th April 2021. For the said proposal Nagpur Municipal Corporation is Planning Authority.

In the said revised sanctioned Development Plan of Nagpur city, Nagpur Municipal Corporation has decided to propose modification under Section - 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 the land bearing Kh. No. 63 to 69 & 71 at Mouza - Parsodi, In Bhamti-Parsodi Street Scheme of Nagpur Improvement Trust in Nelco Gruh Nirman Sahakari Sanstha Land for reservation of "Parking" Reservation No. SW-82 area of land 0.4035 Hect. Designated use as per sanctioned layout area 0.0672 hect. for remains as parking and remaining land to be shown in "Residential Zone" and as per Development Plan reservation of "Primary School" Reservation No. MSW - 13, Reservation of "Library" reservation No. MSW-12 total admeasuring 1.246 hect. land use to be deleted and included in "Play Ground" as per section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The Nagpur Municipal Corporation desirous of making some modification under Section of 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Nagpur Municipal Corporation passed the Administrative Resolution No. 85-मनपा-प्रशासक, Dated 11th December, 2025 for making the aforesaid modification.

And thereafter the part plans of Development Plan of Nagpur showing the aforesaid modification is displayed in the office of Deputy Director, Town Planning Dept. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C, Wing Third Floor, Civil Line, Nagpur - 440001 for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objection in writing which may be received by Town Planning Dept. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C, Wing Third Floor, Civil Line, Nagpur in respect of the said modifications to the Development Plan within a period of 30 days from the date of publication in the *official Gazette*, will be considered by the Municipal Corporation before submitting the said modification proposal, to the State Govt, for sanction.

Dr. ABHIJIT CHOUDHARY,
Commissioner & Administrator,
Municipal Corporation, Nagpur.

Nagpur :
Dated the 15th December, 2025.

————

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९९.

**आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल.**

## सूचना

क्रमांक मनपाना-नरवि-२०३०-२०२५.—

नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३ - प्र.क्र. ३०० (अ) - ९७ - नवि -९, दि. ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दि. ०१ मार्च,२००० पासून अंमलात आली आहे. तसेच, वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरित नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापि, शासनाकडील नगर विकास

विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र. १५४-२०१९-नवि-९, दिनांक २७ऑगस्ट,२०१९ अन्वये संपूर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस -२४१९-प्र.क्र.-१५४ (भाग - १)२०१९-नवि-९, दिनांक ०९ एप्रिल, २०२१ अन्वये ७ योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना अहवालानुसार मौजा-सिताबर्डी, खसरा क्र. २८३, नगर भूमापन क्र. १८५५/१ पैकी ०.१२९६ हेक्टर जागा आरक्षण क्र. W-५५ (पार्किंग) या आरक्षणाखाली राखीव असून सदर जागा मोकळी आहे. सदर आरक्षण विकसित करण्यासाठी समूचित प्राधिकरण तथा नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका, नागपूर आहे.

उक्त जागेची व रस्त्याची मालकी नागपूर महानगरपालिकेच्या नावाने आखिव पत्रिकेनुसार दिसून येते. विकास योजना अहवालानूसार उक्त आरक्षण क्र. W-५५ (पार्किंग) क्षेत्र ०.१२९६ हेक्टर (१२९६.०० चौ.मी.) व आरक्षणालगत १८.०० मी. रस्त्यामधील ८५.०० मी. x १८.०० मी. = १५३०.०० चौ.मी. जागा (अंदाजे) बाधित होत आहे. (एकूण अंदाजे क्षेत्र २८२६.०० चौ.मी.).

सध्यास्थितीत सदर जागेवर पार्किंगचे आरक्षण तथा रस्ता असल्याने उपरोक्त नमूद नविन विधानभवनाचे विस्तारीकरण करण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. सबब, वस्तुस्थिती विचारात घेता मौजा - सिताबर्डी, खसरा क्र. २८/३, नगर भुमापन क्र. १८५५/१ पैकी ०.१२९६ हेक्टर जागा आरक्षण क्र. W-५५ (पार्किंग) तथा या आरक्षणालगत १८.०० मी. रुंदीचा अस्तित्वात असलेला रस्त्याचे वापर बदल करून लगतचे "सार्वजनिक / निर्मसार्वजनिक वापर (Public / Semipublic Zone)" चे वापर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये ठराव क्र. ८१-मनपा-प्रशासक, दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या उपसंचालक, नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सुचित करण्यात येते की, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात या सूचना किंवा हरकती उपसंचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडून शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

**डॉ. अभिजित चौधरी,**
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक १५ डिसेंबर, २०२५.

———————

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९००.

BY COMMISSIONER AND ADMINISTRATOR, MUNICIPAL CORPORATION

**MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—**

*NOTICE*

No. NMC-TPD-2030-2025.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31*(1)* has been partially sanctioned by the Govt. *Vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, Date. 7th January, 2000 and came into force from 1st March, 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Govt. Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, Dated. 10th September, 2001 and came into force from Dated 21st September, 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the "Planning Authority" for Nagpur City except the area covered under seven schemes *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, Date 27th February, 2002 and Nagpur Municipal Corporation has been declared as

"Planning Authority" for Nagpur City areas coverd under seven scheme *vide* Government Notification No.TPS-2419-1419-CR -154-2019-UD-9, Dt. 27th August, 2019 and aslo Nagpur Municipal Corporation has been declared as "Planning Authority" for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2419-1419-C.R. 154(Part-1)-2019-UD-9, Dt. 09th April, 2021. For the said proposal Nagpur Municipal Corporation is Planning Authority.

According to Sanctioned Revised Development Plan of Nagpur City, out of Mouza-Sitabuldi, Survey No. 283, City Survey No. 1855/1, an area of 0.1296 hectares is reserved under Reservation No. W-55 (Parking) and the said place is vacant. The Competent authority and planning authority for developing the said reservation is Nagpur Municipal Corporation, Nagpur.

The ownership of the above mentioned land and road appears to be in the name of Nagpur Municipal Corporation as per the revenue record. According to the Development Plan report, the said Reservation No. W-55 (Parking) area 0.1296 hectares (1296.00 sq. m.) and an area of 85.00 m. x 18.00 m. = 1530.00 sq. m. (approx) within the 18.00 m. road adjacent to the reservation is affected. (Total approximate area 2826.00 sq. m.)

Currently, due to the parking reservation and road on the said land, Technical difficulties are arising in the expansion of the above mentioned new Vidhan Bhavan. Considering the above facts, approval has been granted to change the use of the area of 0.1296 hectares under Reservation No. W-55 (Parking) in Mouza Sitaburdi, Survey No. 283, City Survey No. 1855/1 and the existing 18.00 m. wide road adjacent to this reservation to the adjacent "Public / Semipublic Zone" use as per Resolution No. 81/NMC-Administrator, dated 03rd December, 2025 under section 37 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966.

And thereafter the part plans of Development Plan of Nagpur showing the aforesaid modification is displayed in the office of Deputy Director, Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C Wing, Third Floor, Civil Line, Nagpur- 440 001 for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections in writing which may be received by Deputy Director, Town Planning Dept. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C wing third floor Civil line, Nagpur in respect of the said modification to the Development Plan within a period of 30 days from the date of publication in the *official Gazette*, will be considered to hearing by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Govt, for sanction.

Dr. ABHIJIT CHOUDHARY,
Commissioner & Administrator,
Municipal Corporation, Nagpur.

Nagpur :
Dated the 15th December, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.